**ठळक बातम्या**

- लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यातलं मतदान शांततेत / सर्वाधिक मतदान मणिपूर आणि त्रिपुरात ७६ टक्के तर सर्वात कमी मतदान महाराष्ट्रात, सुमारे ५४ टक्के

- लोकसभा निवडणुकीच्या चौथ्या टप्प्यातल्या अर्जांची छाननी पूर्ण/ पाचव्या टप्प्यासाठी अर्ज भरायला प्रारंभ

- तिसऱ्या टप्प्यातल्या प्रचाराला जोर

- सर्व VVPAT पावत्यांची मोजणी करण्याची मागणी सर्वोच्च न्यायालयानं फेटाळली

**आणि**

- मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समधे ६०९ अंकाची घसरण

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यात आज देशभरातल्या ८८ मतदारसंघांमधे शांततेत मतदान झालं. राज्यनिहाय मतदानाची अंदाजे टक्केवारी याप्रमाणे –

केरळात २० ठिकाणी मतदान झालं. सुमारे ६४ टक्के मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. कर्नाटकात १४ मतदारसंघातल्या ६४ टक्के तर राजस्थानात १३ मतदारसंघातल्या ६० टक्के मतदारांनी मतदान केलं. उत्तरप्रदेशात ८ जागांवर

५३टक्के तर मध्यप्रदेशात ६ जागांवर ५५ टक्के मतदान झालं. आसामात ५ मतदारसंघात ७१ टक्के मतदारांनी आणि बिहारच्या ५ मतदारसंघात ५३ टक्के मतदारांनी आपला कौल मतदान यंत्रात नोंदवला. पश्चिम बंगालमधे ३ ठिकाणी मतदान झालं. सुमारे ७२टक्के मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. छत्तीसगडमधेही ३ ठिकाणी मतदान झालं, तिथे सुमारे ७२टक्के नागरिकांनी मतदान केलं. मणिपूर आणि त्रिपुरामध्ये एकेका मतदारसंघात मतदान झालं. दोन्हीकडे ७६ टक्क्यांपेक्षा जास्त मतदारांनी मत नोंदवलं, जम्मू काश्मीरच्या एका मतदारसंघात ६७ टक्के मतदान झालं. महाराष्ट्रातल्या ८ मतदारसंघात मिळून अंदाजे ५४ टक्के मतदान झालं. संध्याकाळी ५ वाजेपर्यंत राज्यात सरासरी ५३ पूर्णांक ५१ शतांश टक्के मतदानाची नोंद झाली होती. सर्वाधिक ५६ पूर्णांक ६६ शतांश टक्के मतदान वर्ध्यात झालं. सर्वात कमी ५२ टक्के मतदानाची नोंद हिंगोलीत झाली. यवतमाळ-वाशिम, परभणी, अमरावती मध्ये सुमारे ५४ टक्के तर अकोला, बुलडाणा आणि नांदेडमध्ये ५२ टक्क्यांपेक्षा जास्त मतदान झालं. एकूण २०४ उमेदवारांचं भवितव्य मतदारांनी यंत्रात नोंदवलं.

केंद्रीय मंत्री राजीव चंद्रशेखर, १७व्या लोकसभेचे सभापती ओम बिरला, कांग्रेसचे माजी अध्यक्ष राहुल गांधी, माजी केंद्रीय मंत्री शशी थरूर, ज्येष्ठ अभिनेत्री हेमा मालिनी आणि अभिनेता अरुण गोविल अशा दिग्गजांसह देशभरातल्या १ हजार २०२ उमेदवारांचं भवितव्य आज मतदान यंत्रात बंद झालं.

<><><><><>

ते श्रोतेहो, राज्यातल्या आजच्या मतदानाचा आढावा घेणारा विशेष कार्यक्रम ‘मतदानाचा मागोवा’ आकाशवाणीच्या अस्मिता वाहिनीवर आज हे बातमीपत्र संपल्यावर सादर होणार आहे.

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकीच्या चौथ्या टप्प्यातल्या उमेदवारी अर्जांची छाननी आज झाली. उमेदवारी मागं घेण्याची मुदत येत्या २९ एप्रिल पर्यंत आहे. या टप्प्यात महाराष्ट्रात नंदुरबार, जळगाव, रावेर, बीड, जालना, पुणे, शिरूर, मावळ, अहमदनगर, शिर्डी, आणि औरंगाबाद या ११ मतदारसंघातलं मतदान येत्या १३ मे रोजी होणार आहे.

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकीच्या पाचव्या टप्प्यासाठी अर्ज भरायला आजपासून सुरुवात झाली. या मतदारसंघात इच्छुकांना ३ मे पर्यंत अर्ज भरता येतील. यात राज्यातल्या १३ मतदारसंघांसह देशातल्या एकूण ४९ मतदारसंघांचा समावेश आहे. त्यात मुंबईतले सर्व ६ मतदारसंघ, **ठाणे, कल्याण, भिवंडी, पालघर, नाशिक, दिंडोरी आणि धुळे** या लोकसभा मतदारसंघांचा समावेश आहे.

ईशान्य **मुंबईतले** भाजपा उमेदवार मिहिर कोटेचा यांनी आज उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत अर्ज भरला. तसंच सुक्ष्मा मौर्य या अपक्ष उमेदवारानंही आज अर्ज भरला. **नाशिक** लोकसभा मतदारसंघातून बाबाजी भक्त परिवाराचे शांतीगिरी महाराज यांनी अपक्ष उमेदवार म्हणून अर्ज भरला. दिंडोरीतून मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे माजी आमदार जीवा पांडू गावित आणि सुभाष रामू चौधरी यांनी उमेदवारी अर्ज दाखल केले. **पालघरमधून** बहुजन विकास आघाडीचे उमेदवार म्हणून राजेश पाटील यांनी आज अर्ज भरला.

**कल्याण** लोकसभा मतदारसंघात आज सुशिला कांबळे आणि अमित उपाध्याय यांनी अर्ज जमा केले.

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकीच्या पुढच्या टप्प्यासाठी सर्वच राजकीय पक्ष जोरदार प्रचार करीत आहेत. पश्चिम बंगालमधल्या मालदा इथं प्रधानमंत्री आणि भाजपाचे वरिष्ठ नेते नरेंद्र मोदी यांची आज सभा झाली. तुष्टीकरणाचं राजकारण करण्यात काँग्रेस आणि तृणमूल सारखेच आहेत अशी टीका मोदी यांनी यावेळी केली.

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी आज मध्यप्रदेशात अशोकनगर आणि राजगढ मतदारसंघात प्रचारसभा घेतल्या. भाजपाच्या नेतृत्वाखाली केंद्रसरकार समान नागरी कायदा लागू करेल असं आश्वासन त्यांनी दिलं, तसंच मोदी सरकारच्या काळात देशातल्या नक्षली आणि दहशतवादी कारवायांना पायबंद बसल्याचा दावाही केला. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष जितू पटवारी, खासदार विवेक टंखा आणि मजी केंद्रीय मंत्री अरुण यादव यांनीही बुऱ्हाणपूरमधे सभा घेतल्या. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज उत्तरप्रदेशात बरेली इथं मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्यासह रोड शो करीत आहेत.

**<><><><><>**

या वेळचं मतदान हे भाजपासाठी नसून, भारताला सर्वोच्च पदावर पोहोचवण्यासाठी असल्याचं भाजपाचे स्टार प्रचारक उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी म्हटलं आहे. ते आज रत्नागिरी जिल्ह्यातल्या राजापूरमध्ये नारायण राणे यांच्या प्रचारासाठी आयोजित सभेत बोलत होते.

फडनवीस यांनी आज **पेण मध्ये** देखील महायुतीचे उमेदवार सुनील तटकरे यांच्या प्रचारसभेला संबोधित केलं.

**<><><><><>**

लोकसभेच्या निवडणुकीचा दुसरा टप्पा होत असताना भारतीय जनता पक्ष आणि त्यांच्या मित्रपक्षांची घाबरगुंडी उडाली आहे, त्यामुळे ते काँग्रेस आणि इंडिया

आघाडीवर, खालच्या पातळीवर येऊन टीका करत आहेत, अशी टीका काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केली आहे.

**<><><><><>**

सर्व ‘VVPAT’, म्हणजेच वोटर व्हेरिफायेबल पेपर ऑडिट ट्रेलमधल्या सर्व चिठ्ठ्यांची मोजणी करण्याची मागणी सर्वोच्च न्यायालयानं आज फेटाळली. नायमूर्ती संजीव खन्ना आणि न्यायमूर्ती दीपंकर दत्ता यांच्या पीठानं हा निर्णय दिला. निवडणूक आयोगानं दिलेल्या स्पष्टीकरणाच्या आधारावर न्यायालयानं आज हा निर्णय दिला. मात्र, सर्वोच्च न्यायालयानं निवडणूक आयोगाला दोन निर्देश दिले. त्यानुसार EVM मध्ये चिन्ह लोड केल्यानंतर, चिन्ह लोडिंग करणारं युनिट सीलबंद करावं आणि कंटेनरमध्ये सुरक्षित करावं. उमेदवार आणि त्यांच्या प्रतिनिधींनी या सील वर स्वाक्षरी करावी. तसंच निकाल जाहीर झाल्यानंतर किमान ४५ दिवस ईव्हीएमसह सीलबंद कंटेनर स्टोअर रूममध्ये ठेवावेत. ईव्हीएम प्रमाणेच ते उघडावेत आणि सीलबंद करावेत असं यात म्हटलं आहे. ५ टक्के ईव्हीएममधले burnt memory semi controller उमेदवारांच्या मागणीनुसार उत्पादकांच्या अभियंत्यांनी तपासावं, असं दुसऱ्या निर्देशात म्हटलं आहे.

**<><><><><>**

राष्ट्रीय चाचणी संस्थेतर्फे घेण्यात आलेल्या जेईई मेन्समध्ये महाराष्ट्राच्या वाशिम जिल्ह्यातला नीलकृष्ण गजरे हा तीनशेपैकी तीनशे गुण मिळवून देशात पहिला आला आहे. शेगावच्या बुरुंगले महाविद्यालयात शिकणारा नीलकृष्ण वाशिम जिल्ह्यातल्या बेलखेडमधला असून त्याचे वडिल शेतकरी आहेत.

**<><><><><>**

मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्स मधे आज ६०९ अंकाची घट झाली आणि तो ७३ हजार ७३० अंकांवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टीही १५० अंकांच्या घसरणीसह २२ हजार ४१९ अंकांवर बंद झाला.

**<><><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज कोलकाता इथल्या हिडन गार्डन्स मैदानावर कोलकाता नाईट रायडर्स आणि पंजाब किंग्ज यांच्यात सामना सुरु आहे. पंजाब किंग्जनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला. शेवटची बातमी हाती आली तेव्हा कोलकाता नाईट रायडर्सच्या ७ षटकात नाबाद ८५ धावा झाल्या होत्या.

**<><><><><>**

देशाच्या पूर्व आणि दक्षिण द्वीपकल्प प्रदेशात पुढले ४ दिवस तीव्र-ते अती-तीव्र स्वरूपाची उष्णतेची लाट राहील असा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे. बिहार, झारखंड, आंध्रप्रदेशच्या पूर्व भागात येत्या ३० एप्रिल पर्यंत, तर पश्चिम उत्तर प्रदेश आणि कोकणात येत्या २९ एप्रिल पर्यंत उष्णतेची लाट राहील असा अंदाज आहे.

**//<><><><><>//**